नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 10/11/2021 (बुधवार)
(सकाळ)

---

## जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 02 कि.मी अंतरावर मौजा केटीएम मॉलचा समोर ब्राम्हणी येथे दिनांक 09/11/2021 चे 12.30 वा. ते 13.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– भारत रमेश बाहेकर वय 31 वर्ष रा. नवीन सुभेदार श्रीराम नगर प्लॉट नं. 68 नागपुर व आरोपी क्र. 1) भुषण रमेश बाहेकर वय 29 वर्ष रा. नवीन सुभेदार श्रीराम नगर प्लॉट नं. 68 नागपुर व 2) दिपक अशोक डांगरे वय 42 वर्ष रा. प्लाट नं. 6 हनुमान मंदीर जवळ जय जलाशय नगर खरबी नागपुर हे ब्राम्हणी फाटा कळमेश्वर येथुन घोराड येथे पायदळ चालत जात असतांना आरोपीने फिर्यादीस दारू पिण्याकरिता 100 रू. मागितले. फिर्यादीने नकार दिल्याने आरोपीने फिर्यादीस जिवे मारतो म्हणुन आरोपी क्र 02 याने फिर्यादीस रस्त्याच्या डाव्या बाजु असल्यास कचऱ्यामध्ये ढकलुन खाली पाडले. त्यानंतर आरोपी क्र 2 हा फिर्यादीचा पाठीवर बसला व कचऱ्यात असलेल्या फुटलेल्या काचेच्या बाटलीने फिर्यादीचा जिव घेण्याचे उदेशाने मानेवर व गळयावर वार केला. आरोपी क्र 02 हा फिर्यादीस काचेच्या बाटलीने मानेवर मारत असतांना फिर्यादीचा भाउ आरोपी क्र. 1. भुषन याने आरोपी क्र 02 यास फिर्यादीचा जिव घेण्याचे उदेशाने आणखी मार असे ओरडु लागला. त्यामुळे रस्त्याने जाणाऱ्या लोकांची गर्दी जमल्याने आरोपी हे तेथुन पळुन गेले. लोकांनी फिर्यादीस मेयो रूग्णालय येथे दाखल केल्यानंतर त्याच्यावर डॉक्टरांनी उपचार केल्यानंतर वैद्यकीय अधिकारी समक्ष नोंदविलेल्या जबाबावरून सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीतांविरुध्द कलम 307, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपी क्र. 2 ला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री संतोषसिंग ठाकुर मो.नं. 9422884815 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर